**ठळक बातम्या**

- बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची अधिसूचना जारी/ उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत १७ ऑक्टोबरपर्यंत

- पीएम धन-धान्य कृषी योजना आणि दलहन आत्मनिर्भरता मोहिमेचा उद्या प्रधानमंत्र्यांच्या हस्ते प्रारंभ

- दहशतवादाचा सामना करण्यासाठी भारत आणि अफगणिस्तानने एकत्र येऊन काम करण्याची गरज असल्याचा परराष्ट्र मंत्र्यांचा पुनरुच्चार

**आणि**

- भारत - वेस्ट इंडिज दुसरा क्रिकेट कसोटी सामना सुरु/ नाणेफेक जिंकून भारत प्रथम फलंदाजीला मैदानात

**<><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची अधिसूचना आज जारी झाली. त्याबरोबरच, उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया देखील सुरू झाली असून, अर्ज भरण्याची अंतिम तारीख १७ ऑक्टोबर आहे. एकंदर २४३ सदस्यांच्या विधानसभेसाठी दोन टप्प्यांत मतदान होणार आहे. पहिल्या टप्प्यात १२१ जागांसाठी, ६ नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून, ११ नोव्हेंबरला दुसऱ्या टप्प्यासाठी मतदान होईल. १४ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होईल. या पार्श्वभूमीवर राज्यात राजकीय हालचालींना वेग आला आहे; मात्र, अद्यापही विविध राजकीय पक्षांमधील जागावाटपाचा तिढा कायम आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या घटक पक्षांमधे आज जागावाटपाची बोलणी पूर्ण होण्याची शक्यता आहे. भाजपाचे निवडणूक प्रभारी केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान वेगवेगळ्या घटक पक्षांबरोबर बैठका घेणार आहेत. राजद नेता तेजस्वी यादव यांनी काल देन मित्रपक्षांबरोबर चर्चा केली पण त्यात काहीही तोडगा निघाला नाही. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आज राजद अध्यक्ष लालू प्रसाद यादव यांच्याबरोबर जागावाटपाची चर्चा करणार आहेत.

**<><><><>**

मतदार यादीत नाव असलेल्यांना मतदान करण्यासाठी ओळखीचा पुरावा म्हणून मतदार ओळखपत्र किंवा इतर बारा पर्यायी ओळखपत्रांपैकी कोणतेही एक सादर करता येईल असं निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे. बिहार विधानसभा निवडणूक तसंच इतर राज्यातल्या पोटनिवडणुकांच्या मतदारसंघात जवळपास सर्व मतदारांना ओळखपत्र देण्यात आली आहेत. असं आयोगानं सांगितलं आहे. अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांमध्ये सर्व नवीन मतदारांना ओळखपत्रे मिळतील अशी खात्री सगळ्या ठिकाणच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी करुन घ्यावी असे निर्देशही आयोगाने दिले आहेत.

<><><><>

तेलंगण राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद प्रादेशिक मतदार संघ निवडणुका स्थगित केल्या आहेत. उच्च न्यायालयाने मागासवर्गीयांना आरक्षण वाढवून ४२ टक्के करण्याचा अंतरिम स्थगिती आदेश काल जारी केला. निवडणूक आयोगाने आवश्यक राजपत्र अधिसूचना मंजूर करून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्थगित केल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत्या २३ तारखेपासून नियोजित होत्या आणि यासाठीची नामांकन प्रक्रिया काल पासून सुरू झाली होती. राज्य सरकारला प्रति- प्रतिज्ञापत्र दाखल करण्यासाठी चार आठवड्यांचा कालावधी देण्यात आला आहे.

<><><><>

प्रधानमंत्री धन धान्य कृषी योजनेचा प्रारंभ उद्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्लीत पुसा इथं होणार आहे. या कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दलहन आत्मनिर्भरता मोहिमेचं उद्घाटनही करतील. याच कार्यक्रमात शेतकऱ्यांसाठी ४२ हजार कोटी रुपयांहून अधिक मूल्यांच्या विविध योजनांचा ही प्रारंभ ते करणार आहेत. तसंच पशुपालन, मत्स्यपालन आणि अन्न प्रक्रिया क्षेत्रांतल्या ११ शे हून अधिक प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी मोदी यांच्या हस्ते केली जाणार आहे. राज्यामध्ये केंद्र आणि राज्य शासनाद्वारे कार्यान्वित असलेल्या ३६हून अधिक योजना राबवून पिकांची उत्पादकता वाढवणं, पीक उत्पादनाची शाश्वतता सुनिश्चित करणं, तसंच काढणी पश्चात तंत्रज्ञान आणि

पतपुरवठा प्रणाली मजबूत करण्याच्या उद्देशानं देशातल्या १०० आकांक्षित जिल्ह्यांमध्ये ही योजना राबवण्यात येणार आहे.

यामध्ये महाराष्ट्रातल्या छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, पालघर, रायगड, धुळे या नऊ जिल्ह्यांची निवड झाली आहे. महाराष्ट्रात राज्यस्तरीय कार्यक्रम पुण्यात कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या कार्यक्रमात कृषी क्षेत्रात प्रयोगशील आणि प्रगतिशील कामगिरी करणारे ३०० हून अधिक शेतकरी सहभागी होणार असल्याचं  कृषीमंत्री भरणे यांनी सांगितलं.

**<><><><>**

नवी दिल्लीत होणाऱ्या भारत आंतरराष्ट्रीय तांदूळ परिषद २०२५ ची सर्व दालनं भरली असल्याची माहिती भारतीय तांदूळ निर्यात महासंघानं दिली. ही परिषद ३० आणि ३१ ऑक्टोबरला भारत मंडपम इथं होणार आहे.

या परिषदेत सुमारे १५० तांदूळ उत्पादक सहभागी होणार असून त्यात तांदळाशी संबंधित विविध नवकल्पना, तंत्रज्ञान आणि प्रीमियम तांदूळाच्या विविध जाती सादर केल्या जातील.करणार आहेत. जागतिक तांदूळ उद्योगाच्या इतिहासातली ही सर्वात मोठी परिषद असून यात  ८० हून अधिक देशांतले एक हजारांहून अधिक खरेदीदार आणि देशातले पाच हजारांहून अधिक शेतकरी सहभागी होणार आहेत.

या परिषदेत जीआय-टॅग मिळालेले काला नमक राइस, काली काशा, गोविंद भोग, इंद्रायणी जोहा राइस आणि ब्लॅक राइस या तांदूळाच्या जाती बघायला मिळणार आहेत. तांदूळाच्या या जाती त्या त्या प्रदेशांत लोकप्रिय असल्या तरी या परिषदेच्या माध्यमातून त्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख मिळण्याची संधी पहिल्यांदाच मिळणार आहे.

**<><><><>**

दहशतवादाचा सामना करण्यासाठी भारत आणि अफगाणिस्तानाने एकत्र येऊन काम करण्याची गरज असल्याचा पुनरुच्चार परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी केला आहे. नवी दिल्ली इथे अफगाणिस्तानचे परराष्ट्र मंत्री अमीर खान मुत्ताकी यांच्याबरोबर झालेल्या भेटीनंतरच्या भाषणात ते बोलत होते. दोन्ही देशांची विकास आणि समृद्धबाबतची वचनबद्धता समान आहे. सरकार अफगाणिस्तानाच्या सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि स्वातंत्र्यासाठी वचनबद्ध असल्याचं जयशंकर यावेळी म्हणाले....

**- - होल्ड.. बाईट - जयशंकर - -**

काबुलमधल्या भारताच्या तांत्रिक मिशनला भारतीय दुतावासाचा दर्जा देण्याची घोषणाही यावेळी परराष्ट्र मंत्र्यांनी केली.

**<><><><>**

भारत संरक्षण उत्पादन क्षेत्रातल्या संरचनात्मक बदलांकडे वेगाने वाटचाल करत आहे असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी म्हटलं आहे. सिडनी इथे भारत ऑस्ट्रेलिया संरक्षण उद्योग आणि व्यापार यावरच्या गोलमेज परिषदेत बोलताना त्यांनी भारताचं संरक्षण क्षेत्रातलं उत्पादन एक लाख ५१ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढल्याचं तर निर्यात २३ हजार ६२२ कोटी रुपयांपर्यंत पोचल्याचं सांगितलं. भारतीय कंपन्यांची संरक्षण उत्पादने आता शंभर देशांना निर्यात होऊ लागल्याची माहितीही त्यांनी दिली.

**<><><><>**

मानसिक आरोग्य दिन आज जगभरात साजरा केला जात आहे. मानसिक आरोग्याशी संबंधित समस्यांबाबत जनजागृती आणि मानसिक आरोग्य निरोगी राखण्यासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांना चालना देणं हा या दिवसाचा उद्देश आहे. आपत्ती आणि आणीबाणीच्या परिस्थितीत मानसिक आरोग्य अशी या वर्षीच्या जागतिक मानसिक आरोग्य दिनाची संकल्पना आहे.

हा दिवस भावनिक आणि मानसिक आरोग्याला प्राधान्य देण्याची आठवण करून देतो असं केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी समाज माध्यमावरील संदेशात नमूद केलं आहे. मानसिक आरोग्याबाबत जनजागृती वाढवण्याची आणि खुलेपणानं संवाद साधण्याची ही महत्त्वाची संधी असल्याचं नड्डा यांनी नमूद केलं.

**<><><><>**

रिझर्व बँकेचे डेप्युटी गवर्नर म्हणून शिरिषचंद्र मुर्मू यांनी काल पदभार स्वीकारला. ते यापूर्वी रिझर्व बँकेच्या कार्यकारी संचालक पदावर होते. या पदाची जबाबदारी तीन वर्षे त्यांच्याकडे असेल.

**<><><><>**

भारत आणि वेस्ट इंडिज क्रिकेट संघादरम्यान दुसरा कसोटी सामना नवी दिल्लीतल्या अरुण जेटली मैदानावर खेळला जात आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा यशस्वी जयस्वाल याच्या शतकी खेळीच्या जोरावर भारतानं १ गड्याच्या मोबदल्यात १९६ धावा केल्या आहेत.

**//<><><><>//**